**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची शनिवार दि. ६ डिसेंबर २००८ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ११२ वी बैठक शनिवार दि. ६ डिसेंबर २००८ रोजी सकाळी ११.३० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. आमदार श्री. सचिन अहिर | सभापती |
| २) | मा. श्री. तानाजी सत्रे, भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| ३) | मा.आमदार श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ४) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ५) | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ६) | मा. श्री. तारीक फारुकी | सदस्य |
| ७) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ८) | मा.श्री.हेमराज शहा | सदस्य |
| ९) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १०) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| ११) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १२) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| १३) | मा. श्री. दिलीप शिंदे,उपसचिव,गृ.नि.विभाग | निमंत्रक |
| १४) | उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १५) | निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

बैठकीच्या सुरुवातीस दि. २६ /११/२००८ रोजी झालेल्या अतिरेक्यांच्या हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी, कर्मचारी, एन.एस.जी.चे अधिकारी,कर्मचारी तसेच बळी पडलेल्या नागरीकांच्या आत्म्यास शांती मिळावी यासाठी तसेच सईद हाऊस या इमारतीच्या झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या रहिवाशांना श्रध्दांजली वाहीली तसेच परमपूज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ५२ व्या महानिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

तद्‌नंतर सचिव यांनी मंडळाची ११२ वी बैठक सुरु करीत असल्याचे जाहीर केले. व दिनांक १६/१०/२००८ रोजी १११ वी व २४/१०/२००८ रोजी १११वी जोड बैठकिचा कार्यवृतांत स्थायी करण्यासाठी मंडळासमोर सादर केले.

**बाब क्रमांक : ११२/१ -**

विषय- दिनांक १६/१०/२००८ रोजी १११वी व २४/१०/२००८ रोजी १११वी जोड बैठकिचा कार्यवृतांत स्थायी करण्याबाबत.

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र. १ ते २७ वर सादर करण्यात आल्याचे सचिव यांनी सांगितले

मा. सभापती यांनी मंडळाचे उपमुख्य अभियंता श्री.त्रिवेदी यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्या पदावर श्री.पटेल यांची नियुक्ती झाल्याचे निदर्शनास आणून उपमुख्य अभियंता (उत्तर) श्री. पटेल यांचे सर्वांच्यातीने अभिनंदन केले.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी मा. सदस्य श्री. किसन जाधव व श्री. व्ही.जी.नायर हे मुंबई बाहेर असल्यामुळे व मा.सदस्य श्री.कमरुद्दीन मर्चंट हे रुग्णालयात दाखल असल्यामुळे आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकणार नाहीत अशी माहिती दिली. मा. सभापती यांनी मा. सदस्य श्री.सईद खान यांनी त्यांना एस.एम.एस.करुन ते आजारी असल्यामुळे आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकणार नाहीत असे कळविल्याचे सांगितले.

सविस्तर चर्चेअंती ११२ व्या बैठकीचे कार्यवृत्त सर्वानुमते स्थायी करण्यात आले.

---------------------------------oo-----------------------------------

**बाब क्रमांक ११२/ २** (दक्षिण परीमंडळ)

विषय- दक्षिण परीमंडळातील उपकरप्रापत इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

<u>प्रचलित प्रमाणित मर्यादा रुपये २०००/- प्रति चौ.मी लागू करणेबाबत.</u>

१) इ.क्र.१०३-१०५ सारंग स्ट्रीट या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती
२) इ.क्र.२४ कॉन्व्हेंट स्ट्रिट या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती
३) इ.क्र.५५ राजवाडकर स्ट्रिट कुलाबा मुंबई
४) इ.क्र.२९अे-२९डी, एम के. रोडच्या दुरुस्तीबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. २९ ते ५७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

मा. सदस्य श्री. बशीर पटेल यानी असे निदर्शनास आणले की, मा. सभापती व त्यांनी सतत पाठपुरावा केल्यानंतर दुरुस्तीची प्रमाणित रक्कम रुपये १२००/- वरुन रु.२०००/- प्रति चौ.मी. झाली. आता शासनातर्फे डी.पी.डी.सी.व विशेष निधी प्राप्त झाला असून त्यासाठी अधिका-यांनी सत्वर अंदाजपत्रके तयार करुन कामास सुरुवात करावी.

यावर श्री. सेहगल, उपमुख्य अभियंता (दक्षिण) यांनी खुलासा केला की, ज्या सन्माननीय सदस्यांचे निधीबाबतचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत त्यांची अंदाजपत्रके बनविण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

दक्षिण परीमंडळातील १०९ उपकरप्रापत इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.२१,३१,३३,६६२./- व निव्वळ रक्कम रु.१२,१५,०३,८३९/- देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१) भाडेकरु/रहिवाशांनी जादाची भरलेली रक्कम परत करण्यात येऊ नये,
२) रक्कम वाढली आहे या कारणास्तव सरसकट दुरुस्तीचे काम हाती घेऊ नये, वाढलेल्या खर्चामुळे सेस वाढल्यास तो भरण्याची भाडेकरुंची लेखी अनुमती घ्यावी.
३) वाढीव खर्चाच्या प्रत्येक प्रस्तावाची उपमुख्य अभियंता यांनी स्वतः खात्री करुन वाढीव खर्च आवश्यक असल्याचे प्रमाणित करावे.
४) सुधारित बजेट तरतुद पडताळून घ्यावी.

--------------------------------xox--------------------------------

**<u>ठराव क्रमांक ११२/९३१</u>**

दक्षिण परीमंडळातील एकूण १०९ उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१) भाडेकरु/रहिवाशांनी जादाची भरलेली रक्कम परत करण्यात येऊ नये,
२) रक्कम वाढली आहे या कारणास्तव सरसकट दुरुस्तीचे काम हाती घेऊ नये, वाढलेल्या खर्चामुळे सेस वाढल्यास तो भरण्याची भाडेकरुंची लेखी अनुमती घ्यावी.
३) वाढीव खर्चाच्या प्रत्येक प्रस्तावाची उपमुख्य अभियंता यांनी स्वतः खात्री करुन वाढीव खर्च आवश्यक असल्याचे प्रमाणित करावे.
४) सुधारित बजेट तरतुद पडताळून घ्यावी

--------------------------------xox--------------------------------

**<u>बाब क्रमांक ११२/ ३</u>**

विषय- उत्तर परीमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

--------------------------------------------------------------------------------

१) इ.क्र.११२ हुजुरीया स्ट्रीट ई विभाग १२०० च्या अधिक दराने मंजुर झालेल्या
कामांना रु २०००/- च्या मर्यादेपर्यंत प्रदान करण्याबाबत.
२) इ.क्र.७अ मलीक बिल्डींग रोड क्र.४ या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामात सुधारीत प्रशासकिय मान्यतापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत.

--------------------------------------------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ६७ ते ११७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

उत्तर परीमंडळातील १२८ उपकरप्रापत इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु..२३,६७,१४,२०९./- व निव्वळ रक्कम रु..१२,६४,०९,५०९/- देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता ठराव क्रमांक ११२/९३१ मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**<u>ठराव क्रमांक ११२/९३२</u>**

उत्तर परीमंडळातील एकूण १२८ उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले त्याचप्रमाणे खालील मालमत्तांना प्रचलित प्रमाणित मर्यादा रुपये २०००/- प्रति चौ.मी लागू करण्याचे एकमताने ठरले.

१) इ.क्र.११२ हुजुरीया स्ट्रीट ई विभाग १२०० च्या अधिक दराने मंजुर झालेल्या कामांना रु २०००/- च्या मर्यादेपर्यंत प्रदान करण्याबाबत.

२) इ.क्र.७अ मलीक बिल्डींग रोड क्र.४ या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामात सुधारीत प्रशासकिय मान्यतापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत.

------------------------------------------XOX------------------------------

**<u>बाब क्रमांक ११२/ ४</u> ( पुनर्रचना विभाग )**

विषय- १) २० मंगलवाडी सी.एस.क्र.७५ डी वार्ड च्या पुनर्रचनेबाबत,
२) भाग्यश्री इमारत दुसरा पारसी वाडा डी विभाग या इमारतीच्या दुरुस्ती अंदाजत्रकांना मंजुरी देणेबाबत
३) इमारत क्र.१७-१७ अे झवेरी बिल्डींग, डीसिल्वा वाडी प्रभादेवी.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ११९ ते १२७ वर मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी २० मंगलवाडी बाबत माहिती देण्याची सूचना केली असता निवासी कार्यकारी अभियंता यांनी माहिती दिली की, हा पायलट प्रोजेक्ट असून सदर इमारतीच्या मालकाने शासनाच्या निर्णयानुसार मंडळाकडे पुनर्रचनेसाठी इमारतीसह जमीन

दिली असून सदर मालकास मंडळातर्फे २२५ चौ.फू. ची सदनिका मोफत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सविस्तर चर्चेअंती उपरोक्त प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

**<u>ठराव क्रमांक : ११२/९३३</u>**

मंडळाने एकमताने निर्णय घेतला की, २० मंगलवाडी सी.एस.क्र.७५ डी वार्ड च्या पुनर्रचनेसाठी मे. इंडियन कन्स्ट्रक्शन कं. यांची २५.९४% व चालू दरसूचीवर ११.९४% अधिक निविदा स्विकारण्यात यावी. तसेच भाग्यश्री इमारत, दुसरा पारसी वाडा डी विभाग या इमारतीच्या दुरुस्तीच्या रु.१२,१८,७६१ च्या अंदापत्रकास मान्यता दिली व इमारत क्र.१७-१७ अे झवेरी बिल्डींग, डीसिल्वा वाडी प्रभादेवी ही इमारत पूर्णतः पडली असल्याने सदर इमारत ८८ (३)(अ) अंतर्गत घोषित न करता इमारतीच्या पुनर्बांधणीसाठी भूसंपादनाची कार्यवाही पुनर्रचना विभागाने करावी

---------------------------------------------oo---------------------------------------------

**<u>बाब क्रमांक ११२/ ५</u>**

विषय- म्हाडा अधि १९७६ कलम ८८ (३) अ चे प्रमाणपत्र देण्याचे प्रस्ताव

-------------------------------------------------------------------------------

इ.क्र.७२-८९, कामाठीपुरा ७वी -८वी गल्ली ( मुसा बिल्डींग) मुंबई

-------------------------------------------------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १२९ ते १३७ वर मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावांची माहिती सचिव यांनी सभागृहास दिली.

सविस्तर चर्चेअंती म्हाड अधिनियम १९७६ कलम ८८ (३) (अ) चे प्रमाणपत्र देण्याचा उपरोक्त प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**<u>ठराव क्रमांक : ११२ / ९३४</u>**

इ.क्र.७२-८९, कामाठीपुरा ७वी -८वी गल्ली ( मुसा बिल्डींग) मुंबई या इमारतीस म्हाड अधिनियम १९७६ कलम ८८ (३) (अ) चे प्रमाणपत्र देण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्याचे ठरले. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास एकमताने मंजूरी देण्यात आली.

--------------------------------------oo---------------------------------------

**बाब क्रमांक ११२/ ६**

विषय- मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पूनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

---

१ भुकर पहाणी क्र.१८३४ आणी १८३६ मांडवी विभाग उपकर क्र.ब ३५१५ इमारत क्र.९६-१०४ जेलरोड आणी ९ उमरखाडी १ ली क्रॉस लेन मुंबई येथिल मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

२ भुकर पहाणी क्र.२/१३०२ आणि १३०४ गिरगांव विभाग, उपकर क्र.डी-१३२४, डी-१३२५(१) आणि डी-१३२५(२), इ.क्र.२२५-२२७ व २२९-२३३ वि.पी.रोड आणि ४ वि.पी.रोड (खोताची वाडी), गिरगांव, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

३ भुकर पहाणी क्र.१९५, २००, २०१, २१०, २११ आणि २१२ माझगांव विभाग, इमारत क्र.२४ए/बी, २२सी, २२डी, २२एफ आणि २२जी, मुंबई- ४०० ०१० येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

४ भुकर पहाणी क्र.६८५ मांडवी विभाग उपकर क्र.ब-८४८ इमारत क्र.१२९नारायण धुरू स्ट्रीट, (हेमंत निवास) मुंबई

५ भुकर पहाणी क्र.१५४५ आणी १५४६ मांडवी विभाग उपकर क्र.ब २९३३ आणी २९३४ इमारत क्र.६०-६२ आणी ६४-६६ निशानपाडा रोड मुंबई

६ भुकर पहाणी ५४८, माटुंगा विभाग इमारत क्र.७-७डी,७ड़ीए व ७डीबी उपकर क्र फ उ / ७४९९ (२), ७४९९(२ए) व ७४९९ (२बी) वत्सराज लेन माटुंगा मुंबई - १९ धर्मक्षेत्र व धरमसी भवन

७ अंतिम भुकर पहाणी क्र. २४५ टी.पी.एस.-४ माहीम विभाग इमारत क्र.३९ उपकर क्र.ग उ/ ४३५३(१) दयान मंदीर रोड, दादर (प) , मुंबई २८ शास्त्री बिल्डीग

८ भुकर पाहणी क्र.२०४१ आणि २०४२ मांडवी विभाग,क्र.ब.४२६४ आणि ४२६२(२) इ.क्र.२३आणि २५ डॉ.महेश्वरी रोड,मांडवी

९ भुकर पहाणी क्र.६/२११३ (अंशतः) भुलेश्वर विभाग, उपकर क्र.ब २१९७ (१) आणि २२०५ (१), इमारत क्र.३५८-डी, जे.एस.एस.रोड, मुंबई मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१० भुकर पाहाणी क्र.१६८४ भायखळा विभाग इमारत क्र.१०-१२-१२ए आणि २ घेलाभाई स्ट्रिट

११ अंतिम भुखंड क्र.२५८-टी.पी.एस-४ माहीम विभाग इमारत क्र.५१ डी गोखले रोड दादर (प).

१२ भुकर पहाणी क्र. १९०६ भायखळा विभाग, इमारत क्रमांक ५४ए, ५४बी, ५४सी, ४८-५२सी, ५४-५८बी, ६०-६२इ, उपकर क्र.ई-४५१५(४A), ई-४५१५(३), ई-४५१५(४), ई-४५१५(१AA), ई-४५१५(६A), ई-४५१५(६), एम. ए. रोड., भायखळा, मुंबई येथील "रंगवाला कम्पाऊन्ड" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१३ भुकर पहाणी क्र.७०५ गिरगांव विभाग, इ.क्र.७-१७ खेतवाडी ३री लेन आणि एस. व्हि. रोड, गिरगांव, मुंबई येथील "हरीहर निवास" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

------------------------oo--------------------

सचिव यांनी उपरोक्त १३ पुनर्विकासाच्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) च्या प्रस्तावांबद्दल मंडळाच्या सदस्यांना थोडक्यात माहिती दिली.

सविस्तर चर्चेअंती उर्वरित ना.ह.प्र.प्रदान करण्याच्या प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**<u>ठराव क्रमांक : ११२/९३५</u>**

मुंबई बेटावरील खालील १३ मालमत्तांवरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

१ भुकर पहाणी क्र.१८३४ आणी १८३६ मांडवी विभाग उपकर क्र.ब ३५१५ इमारत क्र.९६-१०४ जेलरोड आणी ९ उमरखाडी १ ली क्रॉस लेन मुंबई येथिल मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

२ भुकर पहाणी क्र.२/१३०२ आणि १३०४ गिरगांव विभाग, उपकर क्र.डी-१३२४, डी-१३२५(१) आणि डी-१३२५(२), इ.क्र.२२५-२२७ व २२९-२३३ वि.पी.रोड आणि ४ वि.पी.रोड (खोताची वाडी), गिरगांव, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

३ भुकर पहाणी क्र.१९५, २००, २०१, २१०, २११ आणि २१२ माझगांव विभाग, इमारत क्र.२४ए/बी, २२सी, २२डी, २२एफ आणि २२जी, मुंबई- ४०० ०१० येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

४ भुकर पहाणी क्र.६८५ मांडवी विभाग उपकर क्र.ब-८४८ इमारत क्र.१२९नारायण धुरू स्ट्रीट, (हेमंत निवास) मुंबई

५ भुकर पहाणी क्र.१५४५ आणी १५४६ मांडवी विभाग उपकर क्र.ब २९३३ आणी २९३४ इमारत क्र.६०-६२ आणी ६४-६६ निशानपाडा रोड मुंबई

६ भुकर पहाणी ५४८, माटुंगा विभाग इमारत क्र.७-७डी,७डीए व ७डीबी उपकर क्र फ उ / ७४९९ (२), ७४९९(२ए) व ७४९९ (२बी) वत्सराज लेन माटुंगा मुंबई -१९ धर्मक्षेत्र व धरमसी भवन

७ अंतिम भुकर पहाणी क्र. २४५ टी.पी.एस.-४ माहीम विभाग इमारत क्र.३९ उपकर क्र.ग उ/ ४३५३(१) दयान मंदीर रोड, दादर (प) , मुंबई २८ शास्त्री बिल्डीग

८ भुकर पाहणी क्र.२०४१ आणि २०४२ मांडवी विभाग,क्र.ब.४२६४ आणि ४२६२(२) इ.क्र.२३आणि २५ डॉ.महेश्वरी रोड,मांडवी

९ भुकर पहाणी क्र.६/२११३ (अंशतः) भुलेश्वर विभाग, उपकर क्र.ब २१९७ (१) आणि २२०५ (१), इमारत क्र.३५८-डी, जे.एस.एस.रोड, मुंबई मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१० भुकर पाहाणी क्र.१६८४ भायखळा विभाग इमारत क्र.१०-१२-१२ए आणि २ घेलाभाई स्ट्रिट

११ अंतिम भुखंड क्र.२५८-टी.पी.एस-४ माहीम विभाग इमारत क्र.५१ डी गोखले रोड दादर (प)

१२ भुकर पहाणी क्र. १९०६ भायखळा विभाग, इमारत क्रमांक ५४ए, ५४बी, ५४सी, ४८-५२सी, ५४-५८बी, ६०-६२इ, उपकर क्र.ई-४५१५(४A), ई-४५१५(३), ई-४५१५(४), ई-४५१५(१AA), ई-४५१५(६A), ई-४५१५(६), एम. ए. रोड., भायखळा, मुंबई येथील "रंगवाला कम्पाऊन्ड" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

१३ भुकर पहाणी क्र.७०५ गिरगांव विभाग, इ.क्र.७-१७ खेतवाडी ३री लेन आणि एस. व्हि. रोड, गिरगांव, मुंबई येथील "हरीहर निवास" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

------------------------oo-------------------

**<u>बाब क्रमांक ११२/७</u>**

अ ) विषय-उत्तर परीमंळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मुळ/ सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

------------------------------

उत्तर परीमंडळातील ५० उपकरप्रात इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रुपये ७,२७,७०,१२३/- व निव्वळ रक्कम रुपये ४,४८,६४,४१५/- देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता ठराव

क्र.११२/९३१ मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

ब) विषय- -उत्तर परीमंळातील उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामात सुधारीत प्रशासकिय मान्यतापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी मिळण्याबाबत.

१. ११०, कामाठीपूरा , दुसरी व तिसरी गल्ली
२. ३१-३३ शेख बुऱ्हाण कमरुद्दीन स्ट्रीट
३. ८०८-ए बापुराव जगताप मार्ग
४. ४२,कामाठीपुरा, सहावी गल्ली
५. ५३,कामाठीपुरा, तिसरी गल्ली

**ठराव क्रमांक ११२/९३६**

उत्तर परीमंडळातील एकूण ५० उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मुळ/ सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परीशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकिय मंजुरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता ठराव क्र. ११२/९३१ च्या अटी व शर्तींच्या अधीन राहून कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.तसेच परीशिष्ट -ब प्रमाणे रुपये १२००/- पेक्षा अधिक दराने मंजुर झालेल्या कामांना रुपये २०००/- प्रती चौ.मी.प्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

----------------------------oo--------------------------

**बाब क्रमांक ११२/८**

अ) विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या उत्तर परीमंडळातील उपकर प्राप्त इमारतींना टेकू लावणेच्या अंदाज पत्रकांना प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

| | |
|---|---|
| १. ई विभाग / मु.ई.दु.व पु मंडळ | रु १०,००,०००/- |
| २. फ ग / दक्षिण /मु.ई.दु.व पु मंडळ | रु ९,५०,०००/- |
| ३. फ ग / उत्तर / मु.ई.दु.व पु मंडळ | रु ४,००,०००/- |

--------------------------------

ब) विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दक्षिण परीमंडळातील उपकर प्राप्त इमारतींना टेकू लावणेच्या अंदाजपत्रकांना प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

| | |
|---|---|
| १. अ विभाग / मु.ई.दु.व पु मंडळ | रु ६,००,०००/- |
| २. ब विभाग /मु.ई.दु.व पु मंडळ | रु १९,३९,०००/- |
| ३. डी -१ विभाग / मु.ई.दु.व पु मंडळ | रु ५,२०,०००/- |

--------------------------------------

**ठराव क्रमांक ११२/९३७**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींना टेकू लावण्याच्या अंदाजपत्रकांना परिशिष्ट-अ मध्ये दाखविल्यानुसार व दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींना टेकू लावण्याच्या अंदाजपत्रकांना परिशिष्ट-ब नुसार एकमताने प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

---------------------------------oo---------------------------------

**बाब क्रमांक ११२/९**

अ ) विषय- दक्षिण परीमंळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या मुळ/ सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

--------------------------------------------

दक्षिण परीमंडळातील २३ उपकरप्रात इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रुपये ३७,१६८,६७७/- व निव्वळ रक्कम रुपये २,०६,२१,२२४/- देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहाता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक ११२/९३८**

दक्षिण परीमंडळातील एकूण २३ उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांचे मुळ/ सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परीशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकिय मंजुरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढिल कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---------------------------------oo---------------------------------

विषय- भुकर पहाणी क्र. १/१९०६ भायखळा विभाग, प्लॉट क्र.११९, उपकर क्र.४०९३ (१ई),इ.क्र.२०-२२ गेल स्ट्रीट,आग्रीपाडा, मुंबई-११ येथील साबुवाला बिल्डिंग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

-----------------------------

उपरोक्त प्रस्तावाबाबत निवासी कार्यकारी अभियंता यांनी माहिती दिली की, मालमत्तेच्या मालकाच्या विनंतीनुसार पुनर्विकासाचे ना हरकत प्रमाणपत्र मे नाथानी कन्स्ट्रक्शन

प्रा. लि.यांच्या नांवे मंजूरी द्यावयाची असून मंडळास दि. १६.१०.२००८ रोजी १११ व्या बैठकीत सादर केलेल्या उर्वरित प्रस्तावात कोणताही बदल नाही. मात्र मालमत्तेच्या मालकांकडून/नाथानी पारेख कंन्स्ट्रक्शन कं. प्रा. लि. यांचेकडून नोंदणीकृत मुखत्यारपत्र/ अभिहस्तांतरण खत प्राप्त झाल्यानंतरच विकासाचे ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल.

**ठराव क्रमांक ११२/९३९**

मालमत्तेच्या मालकाच्या विनंतीनुसार पुनर्विकासाचे ना हरकत प्रमाणपत्र मे.नाथानी कन्स्ट्रक्शन प्रा.लि.यांच्या नांवे देण्यास मंजूरी देण्यात आली. मंडळास दि. १६.१०.२००८ रोजी सादर केलेल्या उर्वरित प्रस्तावात कोणताही बदल नाही. मात्र मालमत्तेच्या मालकांकडून / नाथानी पारेख कंन्स्ट्रक्शन कं.प्रा.लि. यांचेकडून नोंदणीकृत मुखत्यारपत्र/अभिहस्तांतरण खत प्राप्त झाल्यानंतरच विकासाचे ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल. असे एकमताने ठरले.

---------------------------------------oo---------------------------------------

मा. सदस्य श्री. हेमराज शहा यांनी असे निदर्शनास आणले की, त्यांच्या विभागातील इमारतीस मंडळाचे अधिकारी भेट देतात व त्या भेटीची त्यांना माहिती देत नाहीत. यावर मा. सभापती यांनी यापुढे संबंधित मा. सदस्यांना कळविण्याची काळजी घेण्यात यावी अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री. बशीर पटेल यांनी संक्रमण शिबीर गाळयांबाबत कार्यवाही करण्यात यावी अशी सूचना केली असता संक्रमण गाळे खाली करण्यासाठी पोलीस बंदोबस्त पाहिजे त्यावेळी मिळत नाही. पोलीस विभागाच्याही अडचणी असतात. बंदोबस्तामध्ये त्यांचे पोलीस अडकलेले असतात.

मा. मुख्य अधिकारी यांनी कुलाबा संक्रमण शिबीरात कारवाईसाठी अधिकारी गेले असता अधिका-यांच्या कामांमध्ये स्थानिक राजकीय कार्यकर्त्यांनी अडथळा निर्माण केल्याचे सांगितले.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, सईद हाऊस इमारतीतील लोकांना संक्रमण गाळे दिले आहेत परंतु रहिवाशी गाळे घेत नाहीत त्याला आपण काय कारणार ?

मा. सदस्य श्री.लष्करी यांनी अशी सूचना केली की, आपण लोकांना व्हेकेशन नोटीस देतो परंतु त्यांना संक्रमण गाळे देऊ शकत नाही. किंवा दिलेले गाळे योग्य नसतील तर त्यांना आपण इतर कोठले गाळे देऊ शकतो का ? किंवा लोकांना भाडे देऊ शकतो का ? यावर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, मिलच्या जमिनीवर संक्रमण शिबीरे बांधण्यात

येणार आहेत. त्यामुळे भविष्यात संक्रमण गाळे उपलब्ध होतील परंतु लोकांना जर भाडे देण्याचा विचार केल्यास लोकांनी दहा हजार रुपये भाडे मागितले तर काय करणार ? जर लोकांना हलविले नाही तर जागा मोकळी होत नाही.

मा. मुख्य अधिकारी यांनी कुलाबा संक्रमण शिबीराचे काम करण्यासाठी तेथील इमारती पाडणे गरजेचे आहे. २२५ चौ.फू. मालकी तत्वावर गाळे बांधण्याचा प्रस्ताव असून काम सुरु करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या इमारती पाडणे गरजेचे आहे असे सांगितले.

मा. सदस्य श्री.लष्करी यांनी अशी सूचना केली की, पुनर्विकास प्रकल्पांच्या भुमिपुजनाचा कार्यक्रम आखण्यात यावा. यावर मा. सभापती यांनी मोतीवाणी चाळीचे ४-५ भाडेकरु आहेत त्यांना पेरु कंपाऊंड येथील संकम्रण शिबीरात जागा हवी आहे पेरु कंपाऊंडमधील जागा मिळेपर्यंत त्यांना अन्य संक्रमण शिबीरात त्वरित जागा देण्यात याव्यात आणि इमारत पाडावी अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री.शिरीसकर यांनी वाकडी चाळ अतिशय धोकादायक असून ती केव्हाही कोसळू शकेल अशी अवस्था आहे. ती इमारत कोसळल्यास जबाबदार कोण ? अशी विचारणा केली.

मा. सदस्य श्री.बांदिवडेकर यांनी पुनर्रचित इमारतीतील पडून असलेल्या गाळयांच्या विक्रीचा प्रस्ताव सादर करण्यात येणार होता. सदर प्रस्ताव सादर करण्यात आला का ? यावर मा. मुख्य अधिकारी यांनी अतिरिक्त क्षेत्रफळाचा प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात येईल असे सांगितले.

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती यांनी श्री. त्रिवेदी हे सेवानिवृत्त झाल्यामुळे उपमुख्य अभियंता (उत्तर) या पदावर श्री. पटेल यांची नियुक्ती झाली आहे अशी माहिती व सर्वांच्यावतीने श्री. पटेल यांचे स्वागत केले व बैठक संपल्याचे जाहीर केले.

मा.मुख्य अधिकारी,मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा. सभापती, मुं.इ.दु.व पु.मंडळ